**सुभाषित:**

त्याज्यं न धैर्यं विधुरेऽपि काले धैर्यात्कदाचिद्गतिमाप्नुयात्सः |
यथा समुद्रेऽपि च पोतभङ्गे सांयात्रिको वाञ्छति तर्तुमेव ||

**अर्थ:**

वाईट काळ आला तरी धीर सोडता कामा नये. त्या धीर धरण्यामुळे कदाचित मार्ग सापडू शकेल. जसं समुद्रात जहाज बुडल्यावर (मनात बळ धरून माणूस) पोहत पोहत (किनारा गाठण्याची) इच्छा करतो. (तो पोहून कदाचित तीर गाठू शकेल, पण घाबरला तर नक्की बुडून जाईल) म्हणून मन घट्ट करून संकटाला तोंड दिलं पाहिजे.